# पंचायत समिती वाडा अर्थसंकल्प सन 2020-2021

## (14) 2239 समाजकल्याण विभाग, समाजकल्याण योजनेचे प्रारुप

**योजनेचे नांव** :- (1) मागासवर्गीय लाभार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य.

**योजनेचा कालावधी** :- दि. 01/04/2020 ते 31/03/2021

**योजनेचे कार्यक्षेत्र** :- पंचायत समिती कार्यक्षेत्र 84 ग्रामपंचायती

**योजना राबविणारी यंत्रणा** :- समाजकल्याण विभाग, पंचायत समिती वाडा

**योजनेचे उद्देश** :- मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी गरजु व गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देवून त्यांची शैक्षणिक व बौध्दिक विकास करण्यास मदत करणे व त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्यास हातभार लावणे.

**योजनेच्या अटी व शर्ती** :-

1) लाभार्थी मागासवर्गीय जातीचा (अ.जा., अ.ज., विजाभज, विमाप्र) असावा.
2) लाभार्थ्यांच्या जातीचा दाखला सक्षम अधिकाऱ्याचा असावा.
3) विद्यार्थी हा शिक्षण घेत असावा.
4) किमान 12 वी पास व त्यापुढील शिक्षणसाठी प्रवेश घेतलेला असावा.
5) विद्यार्थी हा लगतच्या मागील शैक्षणिक वर्षात किमान 50% वा प्रथम संधीत उत्तीर्ण असावा. 12 वी ते पदवीधर तसेच अभियांत्रिकी वैद्यकीय अभ्यासक्रम, व्यावसायीक अभ्यासक्रमांस प्रवेश घेतलेला विद्यार्थी योजनेच्या लाभास पात्र राहिल.
6) लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील अथवा रक्कम रुपये 1,00,000/- च्या आत उत्पन्न असल्याचा दाखला सक्षम अधिकाऱ्याचा असावा.
7) निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे बँक खात्यावर खालीलप्रमाणे प्रती विद्यार्थी रक्कम जमा करण्यात येईल लाभार्थ्यांने अर्जासोबत अधारकार्डाशी लिंक असलेला बँक खाते क्रमांक सादर करावा.
8) लाभार्थी हा स्थानिक रहिवासी असावा.
9) लाभार्थ्यांने यापुर्वी लाभ घेतला नसावा.
10) लाभार्थी निवड करण्याचा अधिकार समाजकल्याण समितीस राहील.
11) लाभार्थी निवड करण्याचा अधिकार पंचायत समिती मासिक सभेस राहील.

**योजनेची कार्यपध्दती** :- गटस्तरावरुन प्रस्ताव मागवून लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना शा.नि. दि. 5/12/2016 नुसार लाभार्थ्यांच्या बँक खाती रक्कम जमा करणेंत येईल

# पंचायत समिती वाडा अर्थसंकल्प सन 2020-2021

# (14) 2239 समाजकल्याण विभाग, समाजकल्याण योजनेचे प्रारुप

| | |
|---|---|
| **योजनेचे नांव** | :- (2) मागासवर्गीय लाभार्थ्यांना शिलाई मशिन. |
| **योजनेचा कालावधी** | :- दि. 01/04/2020 ते 31/03/2021 |
| **योजनेचे कार्यक्षेत्र** | :- पंचायत समिती कार्यक्षेत्र 84 ग्रामपंचायती |
| **योजना राबविणारी यंत्रणा** | :- समाजकल्याण विभाग, पंचायत समिती वाडा |
| **योजनेचे उद्देश** | :- मागासवर्गीय लाभार्थ्यांना स्वंयरोजगारासाठी संधी उपलब्ध करुन देणे आर्थिक दृष्टया सक्षम करणे |
| **योजनेच्या अटी व शर्ती** | :- 1) लाभार्थी मागासवर्गीय जातीचा (अ.जा., अ.ज., विजाभज, विमाप्र) असावा.<br>2) लाभार्थ्याच्या जातीचा दाखला सक्षम अधिकाऱ्याचा असावा.<br>3) लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील अथवा अथवा त्यांचे पालकांचे उत्तन्न रक्कम रुपये 1,00,000/- च्या आत उत्पन्न असल्याचा दाखला सक्षम अधिकाऱ्याचा असावा.<br>4) लाभार्थ्याने यापुर्वी योजनेचा लाभ घेतल नाही याबाबतचा सरपंच / ग्रामसेवकाचा दाखला असावा.<br>5) लाभार्थी हा स्थानिक रहिवासी असावा.<br>6) लाभार्थ्यास मागणी साहित्य वापराचे ज्ञान असावे.<br>7) शिवणकामाचे प्रशिक्षण पुर्ण केलेले असुन वरील साहित्य वापराचे ज्ञान असावे.<br>8) लाभार्थ्यांनी साहित्याचा वापर स्वंयरोजगारासाठी करावा.<br>9) साहित्य देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी लाभार्थ्यांची वैयक्तिक राहील.<br>10) लाभार्थी प्रस्ताव ग्रामसेवक / सरपंच यांनी प्राप्त करुन पंचायत समिती मार्फत / समाजकल्याण विभागास सादर करावेत.<br>11) लाभार्थी निवड करण्याचा अधिकार पंचायत समिती मासिक सभेस राहील. |
| **योजनेची कार्यपध्दती** | :- गटस्तरावरुन प्रस्ताव मागवून लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना शा.नि. दि. 5/12/2016 नुसार लाभार्थ्यांच्या बॅंक खाती रक्कम जमा करणेंत येईल |

# पंचायत समिती वाडा अर्थसंकल्प सन 2020-2021

## (14) 2239 समाजकल्याण विभाग, समाजकल्याण योजनेचे प्रारुप

| | | |
|---|---|---|
| योजनेचे नांव | :- | अपंग लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणे. |
| योजनेचा कालावधी | :- | दि. 01/04/2020 ते 31/03/2021 (सन 2020-21) |
| योजनेचे कार्यक्षेत्र | :- | पंचायत समिती कार्यक्षेत्र 84 ग्रामपंचायती |
| योजना राबविणारी यंत्रणा | :- | समाजकल्याण विभाग, पंचायत समिती वाडा |
| योजनेचे उद्देश | :- | अपंग लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देऊन त्यांना स्वावलंबी बनविणे व त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे, आर्थिक दृष्टया सक्षम बनविणे. |
| योजनेच्या अटी व शर्ती | :- | 1) लाभार्थी किमान 40% अपंग असाव .<br>2) जिल्हा शल्यचिकित्सक यांचा अपंगत्वाचा दाखला असावा<br>3) लाभार्थी हा दा.रे.क्र.खालील असावा अथवा रु. 1,00,000/- पर्यंतचे उत्पन्न असणे आवश्यक.<br>4) लाभार्थ्यांचे वैयक्तिक बँक खाते क्रमांक अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.<br>5) लाभार्थी हा स्थानिक असावा.<br>6) लाभार्थ्यांने यापुर्वी लाभ घेतलेला नसावा.<br>7) लाभार्थी प्रस्ताव यापुर्वी योजनेचा लाभ न मिळाल्याबाबत ग्रामसेवक / सरपंच यांचे शिफारसीसह या कार्यालयास सादर करावेत.<br>8) लाभार्थी निवड करण्याचा अधिकार पंचायत समिती मासिक सभेस राहील. |
| योजनेची कार्यपध्दती | :- | गटस्तरावर प्राप्त प्रस्तावातील लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना शा.नि. दि. 5/12/2016 नुसार लाभार्थ्यांच्या बँक खाती रक्कम जमा करणेंत येईल |